0 5 JAN 2023
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा ज्युदो संघ पंजाबकडे रवाना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा महिलांचा ज्युदो संघ बुधवारी पंजाबकडे रवाना झाला. पंजाब येथील लवली युनिव्हर्सिटी फगवारा येथे ८ ते १२ जानेवारी या काळात होणाऱ्या अखिल भारतीय महिला विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचा हा महिला संघ रवाना झाला आहे.

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिलांच्या स्पर्धा १२ आणि १३ डिसेंबर या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या संकुलामध्ये शिवराज महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडल्या होत्या. या स्पर्धेमधून शिवाजी विद्यापीठाचा महिला संघ निवडला गेला. याचे प्रशिक्षण शिबिर शिवाजी विद्यापीठात प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील आणि सोनाली मगदूम यांच्या मार्गदर्शनात पार पडले.

या संघामध्ये सिद्धी शिऊडकर (४८ किलो, शहाजी महाविद्यालय), सेजल चौधरी (५२ किलो, विवेकानंद कॉलेज), ऊर्मिला रजपूत (५७ किलो, केडब्ल्यू सी कॉलेज), गायत्री निकम (६३ किलो, चिंतामण कॉलेज), समृद्धी करवते (७० किलो, चंद्राबाई शेंडुरे कॉलेज), पल्लवी जाधव (७८ किलो, शहाजी महाविद्यालय), सानिका गायकवाड (७८ किलोवरील वजन गट, विवेकानंद कॉलेज) खेळाडूंचा सहभाग आहे.

या सर्वांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय पाटील, वैशाली खाडे, सोनाली मगदूम यांचे प्रोत्साहन लाभले.

04 JAN 2023

महासत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठ्यांचा इतिहास आंतरराष्ट्रीय पातळीवर जाणार

## डॉ.उमेश कदम; भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत विद्यापीठाचा सामंजस्य करार

कोल्हापूर, ता.३ (प्रतिनिधी) –

**भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाल्यामुळे मराठ्यांचा स्थानिक इतिहास राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे (आयसीएचआर) सदस्य सचिव डॉ.उमेश कदम यांनी येथे केले.**

शिवाजी विद्यापीठाची नववर्षाची सुरुवात या अभिनव सामंजस्य कराराच्या कार्यक्रमाने झाली. या सामंजस्य करारावर डॉ. कदम यांच्यासह विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या.

शिवाजी विद्यापीठ ही आपली मातृसंस्था असून या संस्थेसमवेत हा महत्त्वपूर्ण करार



सामंजस्य कराराप्रसंगी डॉ.उमेश कदम, डॉ.दिगंबर शिर्के, डॉ.विलास शिंदे व इतर.

करीत असताना अभिमान वाटत असल्याचे सांगून डॉ. कदम म्हणाले, मराठा इतिहास हा भारताचा मूळ इतिहास आहे. हा इतिहास परकीयांनी आपल्याला सांगितला. तथापि, मोडी, मराठीसह विविध स्थानिक भाषांमध्ये अद्यापही पुष्कळ इतिहास दडलेला आहे. या कराराअंतर्गत या इतिहासाचे संशोधन करण्यात येणार आहे. त्यांचे डिजीटलायझेशन करून तो सर्वांना उपलब्ध करून देण्यात येईल. काही महत्वाच्या मराठी ग्रंथांचा अनुवाद करून त्यांना राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर न्यावयाचे असेल, तर तसे प्रस्ताव सादर करण्याचीही संधी असेल. या उपक्रमांसाठी प्राथमिक टप्प्यावर १५ लाख रुपयांची तरतूदही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, भारतीय इतिहास संशोधन परिषदेसमवेत होणारा विद्यापीठाचा हा पहिला सामंजस्य करार आहे. मराठा इतिहास जागतिक स्तरावर नेण्याची ही खूप महत्वाची संधी आहे. त्यासाठी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि मराठा इतिहास संशोधन केंद्र यांच्या माध्यमातून ऐतिहासिक साधने व दस्तावेज संस्थेला उपलब्ध करून देण्यात येतील.

या कार्यक्रमामध्ये नवी दिल्ली आणि बेंगलोर येथील भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सर्व सदस्य ऑनलाईन सहभागी झाले तर मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. दत्ता मचाले आदी उपस्थित होते. या प्रसंगी इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले.

पुढारी

# सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**कोल्हापूर :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. शरद बनसोडे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. कैलास सोनवणे आदी उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : अ.भा. विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा ज्युदो संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# अ.भा. स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ ज्युदो महिलांचा संघ रवाना

**कोल्हापूर :** लवली युनिव्हर्सिटी पगवारा पंजाब येथे होणाऱ्या अखिल भारतीय महिला विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठच्या महिलांचा संघ नुकताच रवाना झाला. या संघात सिद्धी शिऊडकर (४८ किलो शहाजी महाविद्यालय), सेजल चौधरी (५२ किलो विवेकानंद कॉलेज), उर्मिला रजपूत (५७ किलो के डब्ल्यू सी कॉलेज), गायत्री निकम (६३ किलो चिंतामण कॉलेज), समृद्धी करवते (७० किलो चंद्राबाई शेंडुरे कॉलेज), पल्लवी जाधव (७८ किलो शहाजी महाविद्यालय), सानिका गायकवाड (७८ किलोवरील - विवेकानंद कॉलेज) यांचा समावेश आहे.

पुण्यनगरी

# भगवान महावीर अध्यासनास प्रा. जानवे यांची देणगी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रा. अशोक दिनकर जानवे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ११ हजार रुपयांची देणगी भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे सुपूर्द केली.

प्रा. अशोक जानवे हे बिद्री दूध साखर महाविद्यालयातून निवृत्त झाले आहेत. ते समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत.

या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील तसेच कुलसचिव व्ही. एन. शिंदे, अजित चौगुले यांनी प्रा. अशोक जानवे यांचे अभिनंदन केले आहे.

पुण्यनगरी

# डेक्कनमध्ये व्हॅल्युएशन कोर्सचे प्रमाणपत्र वितरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे घेण्यात आलेल्या 'सर्टिफिकेट कोर्स इन व्हॅल्युएशन ऑफ इम्मुव्हेबल प्रॉपर्टीज' या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वितरण व माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात येणार आहे. हा मेळावा डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, स्टेशन रोड येथे रविवार, दि. ८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात येणार आहे.

05 JAN 2023 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निधी आखडला योजना रखडल्या

## शिवाजी विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी निधीची प्रतीक्षा

**कोल्हापूर : वैभव गोंधळी**

**काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारने २०११ मध्ये विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ४५ कोटींचा निधी जाहीर केला. त्यापैकी ४० कोटी निधी विविध उपक्रमांसाठी देण्यात येणार होता. या उपक्रमांसाठी घोषित निधीपैकी १० कोटी ६० लाख रुपये आतापर्यंत विद्यापीठाला मिळाले. उर्वरित निधीसाठी प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा सुरू आहे. विद्यापीठाच्या प्रस्तावानुसार अपेक्षित निधी मिळाला नसल्याने हे उपक्रम संथगतीने सुरू आहेत.**

शिवाजी विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी निधी म्हणून ४५ कोटी रुपये घोषित करण्यात आले होते. या निधीपैकी काही निधी पगार तसेच तत्सम कामांसाठी, तर उर्वरित निधी विद्यापीठातील ७ योजनांसाठी देण्यात येणार होता. त्यापैकी ५ कोटी ५६ लाख रुपये निधी पहिल्या टप्प्यामध्ये मिळाला, तर २०२२ मध्ये साधारणपणे ५ कोटी निधी मिळाला, असे एकूण १० कोटी ६० लाख रुपये आतापर्यंत मिळाले आहेत. उर्वरित २९ कोटी रुपये राज्य शासनाकडे प्रलंबित आहेत.

विद्यापीठ प्रशासनाने या निधीच्या मागणीसाठी वारंवार प्रस्ताव पाठविले, तसेच याबाबत मुंबईमध्ये बैठकाही पार पडल्या; मात्र 'टप्प्याटप्प्याने लवकरच निधी मिळेल,' अशा आश्वासनाशिवाय विद्यापीठाच्या पदरात काहीच पडले नाही.

**...गतसाली ५ कोटीच निधी**

देवानंद शिंदे कुलगुरू असताना जुलै २०१५ मध्ये याबाबत मुंबईमध्ये बैठक झाली. या बैठकीमध्ये उर्वरित निधी टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला; मात्र त्यानंतरही निधीसाठी मोठी प्रतीक्षा करावी लागली. विद्यापीठाला २०२२ मध्ये जवळपास ५ कोटी रुपयांचा निधी मिळाला.

**निधीसाठी पाठपुरावा गरजेचा :** विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवानिमित्ताने २०११ मध्ये हा निधी घोषित करण्यात आला. टप्प्याटप्प्याने हा निधी देण्याचे जाहीर करण्यात आलें; मात्र गेल्या ११ वर्षांत केवळ १० कोटी निधी मिळाला. उर्वरित निधी मिळविण्यासाठी विद्यापीठ प्रशासनासह लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केल्यास हा निधी मिळण्याचा मार्ग मोकळा होईल. निधी उपलब्ध झाल्यास विद्यापीठातील सोयी-सुविधा उपलब्ध झाल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास त्याचा उपयोग होईल.

**योजना केवळ कागदावरच..**

या निधीतून एकूण सात योजना सुरू करण्यात येणार होत्या. त्यामध्ये स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीला ४ कोटी ५६, युवा विकास केंद्रास १८ लाख ७२ हजार, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन केंद्रास ५० लाख ४७ हजार, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटसाठी ५ कोटी ३५, असा निधी मिळाला आहे, तर राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँन्ड म्युझियम कॉम्प्लेक्स, कन्व्हेन्शन सेंटर, गोल्डन जुबिली फॅकल्टी हाऊस यांना कोणताही निधी अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे या योजना अजूनही केवळ कागदावरच आहेत.

## विद्यापीठ प्रशासनाचा वर्षापासून पाठपुरावा

**स्वनिधीतून बांधकामे... :** शिवाजी विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी वर्षातील उर्वरित निधी वेळेवर मिळत नाही. त्यामुळे विविध उपक्रम विद्यापीठास स्वनिधीतून पूर्ण करावे लागतात. त्याचा फटका विद्यापीठाच्या अन्य कामकाजावर होतो. विद्यापीठाने यापूर्वी स्वनिधीतील काही रकमेतून इमारतीची बांधकामे पूर्ण केली आहेत. येत्या काळात उर्वरित निधी उपलब्ध झाल्यास अन्य रखडलेले उपक्रम पूर्णत्वास येतील.



| निधी दृष्टिक्षेपात | | | | |
|---|---|---|---|---|
| 45 कोटी | 40 कोटी | पुण्यनगरी Exclusive | 10.60 कोटी | 29 कोटी |
| जाहीर निधी | उपक्रम निधी | | मिळालेला निधी | उर्वरित निधी |

05 JAN 2023 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदभ्रमंतीतून संकटाशी भिडण्याची प्रेरणा

## डॉ. डी. टी. शिर्के; पन्हाळा पावनखिंड मोहिमेत २५० विद्यार्थ्यांचा सहभाग



**पावनखिंड :** येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवर.

**▸सकाळ वृत्तसेवा**

सरूड, ता. ४ : पन्हाळा-पावनखिंड शिवपावन प्रेरणा पदभ्रमंती मोहिमेतून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नवचैतन्य जागृत होते. तसेच संकटाशी भिडण्याची प्रेरणा मिळते, असे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ आणि आनंदराव नाईक कॉलेज चिखल आयोजित मोहिमेत ते बोलत होते. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थी, विद्यापीठातील कर्मचारी यामध्ये सहभागी होते. २५० विद्यार्थ्यांसह कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एस. आर. पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड तसेच अन्य मान्यवर या पायी चालत जाणाऱ्या पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाले होते. मार्गावर अनेक गावात पालखीच्या दर्शनाबरोबरच पालखी वाहकांचे औक्षण केले जात होते. सचिन सूर्यवंशी आणि सह्याद्री प्रतिष्ठानच्या सहकाऱ्यांनी शिवकालीन युद्धकला यांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. संयोजन डॉ. पोपटराव माळी यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

05 JAN 2023
सकाळ

# विधि विद्यार्थ्यांनी याचिका घेतली मागे

## उच्च न्यायालयाने सुनावले खडे बोल; परीक्षेबाबत विद्यापीठ लवकरच घेणार निर्णय



### विद्यार्थ्यांना मनस्ताप

■ विधि शाखेचे विद्यार्थी गेल्यावर्षीही परीक्षांबाबत न्यायालयात गेले होते. त्यांच्या गोंधळामुळे अन्य विद्यार्थ्यांना नाहक त्रास झाला. परीक्षा उशिरा झाल्याने निकालही अपेक्षित वेळेत लागला नाही. त्यामुळे काही विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळाले नाहीत. या विद्यार्थ्यांना विनाकारण मनस्ताप सहन करावा लागला होता.

कोल्हापूर, ता. ४ : शिवाजी विद्यापीठातील विधि शाखेच्या विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात परीक्षेसंदर्भात याचिका दाखल केली होती. याबाबत आज सुनावणी झाली. न्यायालयाने विद्यार्थ्यांना खडे बोल सुनावत याचिका मागे घेण्याबाबत विचारले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी ही याचिका मागे घेतली. दरम्यान विधि शाखेच्या परीक्षेसंदर्भात अद्याप विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने निर्णय घेतला नसून, लवकरच याबाबतचे स्पष्ट निर्देश दिले जातील.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा वेळापत्रकानुसार सुरू आहेत. मात्र, विधि शाखेच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे स्वरुप आणि गुण याबद्दल आक्षेप घेऊन उच्च न्यायालयात धाव घेतली. आज यावर सुनावणी झाली. उच्च न्यायालयाने विद्यार्थी आणि विद्यापीठ प्रशासन दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. त्यानंतर निकाल देताना विद्यार्थ्यांच्या भूमिकेबद्दल आक्षेप व्यक्त केला. न्यायालयाने याचिका मागे घ्या; अन्यथा आम्ही ती फेटाळून लावू असे म्हटले. त्यामुळे त्यांना याचिका मागे घेण्याची नामुष्की पत्करावी लागली. आता विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळ विधि शाखेच्या परीक्षेबद्दल लवकरच स्पष्ट निर्णय घेऊन तारीख जाहीर करेल. त्या तारखेला विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावीच लागेल. तसेच परीक्षेचे स्वरुपही विद्यापीठ नक्की करणार आहे.

### सूत्रधारांवर कारवाई

विधि शाखेच्या विद्यार्थ्यांना न्यायालयात जाण्यासाठी काही जणांनी उद्युक्त केल्याचे निदर्शनास आले आहे. त्या सूत्रधारांवरही कायद्याच्या चौकटीत कारवाई केली जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनातील सूत्रांनी सांगितले.

सकाळ

# महावीर अध्यासनास देणगी



**कोल्हापूर :** डॉ. विजय ककडेंकडे देणगी देताना प्रा. चंद्रकांत जोशी.

कोल्हापूरः प्रा. चंद्रकांत जोशी यांनी शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी ११ हजार रुपयांची देणगी भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांचेकडे सुपूर्द केली. प्रा. चंद्रकांत जोशी हे महावीर महाविद्यालयात प्राध्यापक होते. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे व वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले यांनी प्रा. जोशी यांचे अभिनंदन केले.

सकाळ



कोल्हापूर : अखिल भारतीय महिला विद्यापीठ स्पर्धेसाठी रवाना झालेला शिवाजी विद्यापीठाचा ज्यूदो संघ.

# विद्यापीठ ज्यूदो महिलांचा संघ रवाना

**कोल्हापूर, ता. ४ :** पंजाबमध्ये होणाऱ्या अखिल भारतीय महिला विद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ रवाना झाला. ही स्पर्धा ८ ते १२ जानेवारीदरम्यान होणार आहे.

स्पर्धेसाठीचा संघ असा : सिद्धी शिऊडकर ४८ किलो गट शहाजी महाविद्यालय, सेजल चौधरी ५२ किलो विवेकानंद कॉलेज, ऊर्मिला रजपूत ५७ किलो के डब्ल्यू सी कॉलेज, गायत्री निकम ६३ किलो चिंतामण कॉलेज, समृद्धी करवते ७० किलो चंद्राबाई शेंडूरे कॉलेज, पल्लवी जाधव ७८ किलो शहाजी महाविद्यालय, सानिका गायकवाड ७८ किलोवरील वजन गट विवेकानंद कॉलेज. सर्वांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, रजिस्टर डॉ. व्ही एन शिंदे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय पाटील, वैशाली खाडे, सोनाली मगदूम यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

05 JAN 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदभ्रमंतीने संकटाशी झुंजण्याची प्रेरणा मिळते

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठ- नाईक कॉलेजतर्फे पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीम

प्रतिनिधी
कोल्हापूर

पन्हाळा–पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीम पदभ्रमंतीमधून विद्यार्थ्यांच्या मनात नवचैतन्य जागृत होते. तसेच संकटांशी झुंजण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी पावनखिंड येथे केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि चिखली येथील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या पन्हाळा पावनखिंड शिव पावन प्रेरणा मोहीमेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, ही मोहीम यापुढील काळातही आयोजित करण्यात येईल. या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थी, स्वयंसेवकांपर्यंत शिवकालीन इतिहास पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील पांढरेपाणीपासून मोहिमेत सहभागी झाले आणि त्यांनी पावनखिंडीपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पालखीसमवेत वाटचाल केली. पालखी पावनखिंडीस पोहोचल्यानंतर बाजीप्रभूंच्या स्मारकास मान्यवरांनी अभिवादन केले. यानंतर सचिन सूर्यवंशी आणि कोल्हापूरच्या सह्याद्री प्रतिष्ठानच्या सहकाऱ्यांनी शिवकालीन युद्धकलांचे प्रात्यक्षिक दाखवले. वैष्णवी माने हिने शिवगर्जना केली. मोहिमेत करपेवाडी येथील मुक्कामी शिवशाहीर रंगराव पाटील आणि सहकाऱ्यांनी ऐतिहासिक पोवाडा सादर केला. कळकेवाडी–रिंगेवाडी–माळवाडी येथून पांढरे पाणी येथे मोहीम आली. या गावांमधील छोट्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक अभय जायभाये, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप केले. पांढरे पाणी येथून लेझीम, ढोल, ताशा, धनगरी वाद्य यांच्या निनादात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे प्रस्थान झाले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड आदी मान्यवर पायी चालत पालखी सोहळ्यात सहभागी झाले. वाटेवरील गावांतील महिलांनी पालखीचे दर्शन घेतले. राज्याचे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. प्रशातकुमार वनांजे यांनी शिबिरास भेट दिली. यावेळी त्यांनी हा उपक्रम शिवाजी विद्यापीठापुरता मर्यादित न ठेवता राज्यभरातील विद्यार्थ्यांपर्यंत त्याची व्याप्ती वाढवावी, असे आवाहन केले. यासाठी राज्य शासनही सर्वोतोपरी मदत करील, असेही त्यांनी सांगितले. अभय जायभाये यांनी आभार मानले. संग्राम मोरे, आनंदा घोडे विजय नागावकर यांच्यासह सांगली जिल्हा समन्वयक डॉ. पोपटराव माळी यांनी उपक्रमाचे यशस्वी संयोजन केले.




कोल्हापूर : पावनखिंड येथे शिव पावन प्रेरणा मोहिम पोहचल्यानंतर अभिवादन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, आदी.

तरुण भारत

# विद्यापीठ हॅन्डबॉल संघात न्यू कॉलेजच्या विद्यार्थीनींची निवड

कोल्हापूर : राजस्थानमधील जयपूर येथे होणाऱ्या वेस्ट झोनल हॅण्डबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघात न्यू कॉलेजच्या चार विद्यार्थीनींची निवड झाली आहे. यामध्ये ऋतुजा कळंत्रे, एकता पाटील, साक्षी नाळे, पुजा जाधव यांचा समावेश आहे. या विद्यार्थीनींना प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, उपप्राचार्य डॉ. ए. एम. शेख यांचे प्रोत्साहन तर क्रीडा विभागप्रमीख प्रा. अमर सासणे, संदीप पाटील, राहुल तिवले, प्रदिप साळोखे, दत्तात्रय भोपळे यांचे मार्गदर्शन लाभले.